
UGC Approved Refereed Journal Jr.No.43053

# Printing Area

Special Issue April-2018

International Multilingual Research Journal

ISSN 2394-5303



# Father of Indian Constitution : Dr. Babasaheb Ambedkar

Prof. Dinesh Jaronde

52) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार
डॉ. विजय शंकरराव दिघोरे, भिवापूर || 174

53) भारतीय संविधान आणि आदिवासी
सतिश गोवर्धन पेटकर, चंद्रपूर || 177

54) भारतीय संविधान और महिला अधिकार:—डॉ.अम्बेडकर की दृष्टी से.
प्रा.अतुल एन.खोटे, रिसोड || 181

55) डॉ बाबासाहेब आंबेडकराचे लोकशाही विषयक विचार:
प्रा.गोरख नवनाथ मंगवडे, वेळापूर || 183

56) आंबेडकरपुर्व दलित शाहिरीचा अभ्यास
लामतुरे कपिल बाबुराव || 190

57) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वतंत्र मजूर पक्ष
प्रा. किशोर शेषराव चौरे, बल्लारपूर || 192

58) डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांची विचार प्रक्रीया
दिनेश जारोंडे, कळंब || 194

59) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्म आणि धम्म संदर्भातील विचार
प्रा. पोपळघट आर. एस., पाथ्री || 196

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

52

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार

डॉ. विजय शंकरराव दिघोरे,
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर,जिल्हा नागपूर.

=============***********==============

**प्रस्तावना :**

शिक्षण म्हणजे ज्ञान संपादन करण्याची प्रक्रीया ही एक मानवी जीवनातील अत्यंत महत्वाची प्रक्रीया आहे असे समजून आयुष्याचा अखेरपर्यंत विद्यार्थी राहीलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय इतिहासात कृतीप्रवन व कृतीप्रधान व्यक्तीच्या स्वरूपात भेटतात देशाच्या व जगाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय वास्तविक परिस्थितीच्या संदर्भात जे चिंतन डॉ. आंबेडकरांनी केले आहे. हे अनेक विचारांनी भरले आहे. विचार करीत असतांना त्याला कृतीची जोड देण्याचे कार्य देखील डॉ. आंबेडकरांनी केले. भारतीय शिक्षणाचा विचार करता शिक्षण ही काही उच्चवर्नियाचीच मक्तेदारी झालेली होती. गुरूकूल आश्रमापासून तो आधुनिक अठराव्या शतकापर्यंत किंबहुना ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत या देशात शिक्षणाची मक्तेदारी एका विशिष्ट वर्गापर्यंतच मर्यादित होती. या विशिष्ट वर्गाने इतर तिन वर्गातील जनतेला अज्ञानात ठेवण्याच्या अनेक क्लुप्त्या लढविल्या त्यात धार्मिक आधारावर मोठा पगडा जनतेच्या मनावर बसवून शिक्षणाची दारे खालच्या तिन्ही वर्गातील तसेच स्त्रियांना बंद करण्यात आली उद्देश एकच होता की पुरूषी सत्ता तेही उच्चवर्नियांची पुरूषी सत्ता पिढयानपिढया कायम राहावी जेणे करून वरच्या वर्गातील लोकांना बिना परिश्रमाने ऐश आरामाचे जिवन जगता यावे. देशात ब्रिटिशांच्या आगमनानंतर काही काळाने ब्रिटिशांना हव्या असणाऱ्या कारकुनाच्या निर्मितीसाठी का होईना शिक्षणाची दारे काही प्रमाणात संपुर्ण जनतेसाठी खुली झाली आणि त्यातून एका पुरोगामी पिढीचा जन्म झाला. महात्मा फुले, आगरकर यासारख्या विचारवंतानी ब्रिटिश राजवटीत शिक्षण घेतले महात्मा फुलेंनी शिक्षणाचे महत्व जानले 'विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली, निती विना वित्त गेले, वित्त विना शुद्र खचले.' एका विद्येविना इतके अनर्थ घडले हे जानले आणि विद्येचे दरवाजे शुद्र आणि स्त्रियांना उघडे करून दिले.

डॉ. आंबेडकरांनी या पुरोगामी चळवळीतिल महात्मा फुलेना स्वत:चे गुरू मानले. ''विद्या हे वाघिनीचे दुध आहे.'' ते पिल्या शिवाय मानवात चैतन्य निर्माण होत नाही असे डॉ. आंबेडकरांनी ओळखले. म्हणून त्यांनी स्वत: शिक्षण घेतल्यानंतर भारतील शिक्षणाचे महत्व आणि धोरण ठरविले. शिक्षण संपादन करण्याकरिता त्यांनी अपार असे कष्ट सहन केले. त्यांनी केलेल्या या परिश्रमाला ज्ञानयज्ञाची उपमा म्हणूनच दिल्या जाते. दिवसाला अठरा अठरा तास अभ्यास करून इंग्लड अमेरिकेत जाऊन पदव्या संपादन केल्यानंतर त्यांना शिक्षणाचे भारतीय जनतेसाठी असलेले धोरण. निच्छीत करता आले. शिक्षणाशिवाय भारतीय बहुजन दलितांना तरणोपाय नाही असे त्यांचे ठाम मत झाले.

**शिक्षण हे सामाजिक प्रगतीचे तत्व:—**

ब्रिटिशांचे नेतृत्व स्विकारणाऱ्या या देशाने डॉ. आंबेडकर बाहेर देशातून शिकून आल्यानंतरही बडोद्याच्या ऑफीस मधील शिपायाने दुरून पाणी देणे किंवा कामाच्या फाईली दुरून फेकने यासारखे घृनास्पद कृत्य बाबासाहेबांशी केले. अशा प्रकारचे कृत्य केवळ अज्ञानामुळेच घडू शकते म्हणून अज्ञान घालवून सज्ञानी कृती निर्माण करण्याकरिता शिक्षण महत्वाचे असल्याचे वाटत होते.

डॉ. आंबेडकरांनी ग्रांथीक रूपाने मांडलेले विचार फक्त त्या काळातील उच्चवर्णातील लोकांनाच वाचता येत होते परंतु सर्वसामान्य अस्पृश्याला शिक्षणाचा गंध नसल्यामुळे ते विचार अस्पृश्यांना समजने कठीन होते. म्हणून अस्पृश्यांना शिक्षणाची

व्यवस्था करणे ही त्या काळाची गरज होती. म्हणून १९४५ साली बाबासाहेबांनी पी.ई.एस. सोसायटीची स्थापना केली. शिक्षण ही अन्न, वस्त्र, निवारा हया मुलभूत गरज इतकीच महत्वाची गरज आहे. शिक्षणाने मानसाला मानुसपण मिळते. व्यक्तीमत्वाचा योग्य त्या दिशेने विकास होण्यासाठी शिक्षण हे महत्वाचे सहाय्यभूत साधन आहे. शिक्षणाचे महत्व स्वानुभवाने जानणारा हा शिक्षण महर्षी होता.

**शिक्षणासंबंधीचे विचार :**

डॉ. आंबेडकरांना प्राथमिक शिक्षण राष्ट्रीय दृष्टीने अत्यंत मुलभूत आणि मोलाचा वाटत होता. निदान वयाच्या चौदा वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे असे ज्योतीबा फुले, आगरकर, गोखले सारख्या पुरोगामी विचारंताना वाटत होते. डॉ. आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा विचार केला परंतु ज्या वर्गाने आधिच शिक्षणाचा लाभ घेतला आहे त्यांना प्राथमिक शिक्षणाची सक्ती न करता ज्यांना शिक्षणाची ओळख नाही आणि शिक्षणाचे महत्व पटलेले नाही त्यांनाच शिक्षणाची सक्ती करण्यात यावी असे त्यांचे मत होते सक्तीचा शिक्षणाबरोबरच शिक्षण हे मोफत असावयास हवे असे त्यांचे मत होते ज्यांना पैसे देऊन शिक्षण घेता येत नाही त्यांना मोफत शिक्षण देण्यात यावे शिक्षण सक्तीचे करण्यामागे डॉ. आंबेडकरांचा आनखी एक हेतू होता की, शिक्षण क्षेत्र खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि स्वायत्त हवे असेल तर या क्षेत्रावर व्यक्तीसत्ता असू नये. शिक्षण क्षेत्राची स्वांतत्रता आणि स्वायतता आबाधीत राहिली पाहिजे आणि यासाठी शिक्षणावर प्रांतीक सरकारचा ताबा असणे कसे योग्य आहे. हे त्यांनी पटवून दिले.

**स्त्रि शिक्षणाचा पुरस्कार :**

ज्ञान विज्ञा या पुरूषाप्रमाणे स्त्रियानांही तेवढेच महत्वाचे असल्याचे त्यांचे मत होते. खान तशी माती निपजते आणि म्हणून मुले आणि मुली शिकली तर त्यांची संतती तशीच निपजते असे त्यांना वाटत होते. कोणत्याही समाजातील स्त्रीचा दर्जा हा त्या समाजातील सुधारनेचा मापदंड असतो. म्हणून दलीत समाज परिवर्तनाचे वेध लागलेल्या बाबासाहेबांनी स्त्री स्वांतत्र्याचा पुरस्कार करतांना अनेक सभासंम्मेलनातून तो व्यक्त केला. स्त्री पुरूषांना एकच एक शिक्षण दिले पाहिजे हया मताचे ते होते.

**शिक्षण प्रसारासाठी प्रयत्न :**

शिक्षण प्रसाराची गती पाहता असे दिसून येते की, शिक्षणाच्या बाबतीत सरकार फार उदासिन दिसते. शिक्षण हे प्रत्येक व्यक्ती पर्यंत पोहचविण्याचे सरकारचे नैतिक कर्तव्य आहे. म्हणून शिक्षण पध्दतीचा अवलंब करतांना शिक्षण महागडे न बनविता समाजातील तळाजाळातल्या गरिबापर्यंत शिक्षण पोहचले पाहिजे याची सरकारने दखल घेणे गरजेचे आहे. हे सर्व साध्य करावयाचे असेल तर दलीत वर्गाला शिक्षणासाठी काही खास सवलती देऊन इतरांच्या बरोबरीला आनावे लागेल तरच समाजात शैक्षणिक समता आणण्यास मदत होईल. ज्ञान म्हणजे व्यक्तीचा जीवनाचा पाया आहे आणि म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने बुध्दीचा विकास करण्यासाठी हाल अपेष्ठा सहन करून ज्ञान मिळविले पाहिजे. त्या ज्ञानाच्या बळावर स्वंतत्रपणे विचार करावयास शिकले पाहीजे. म्हणजेच पर्यायाने मनुष्याची वैचारीक प्रगती होणे बाबासाहेबांना अभिप्रेत होते. डॉ. आंबेडकरांच्या विचारावरून विद्यापीठ व महाविद्यालय हे एकाच संस्थेचे महत्वाचे घटक असावीत ते एकमेकापासून फारकत न करता हे दोन घटक संयुक्तरित्या काम करू लागले तर पदविपूर्व तथा पद्वीत्तर विद्यार्थ्यांना सांस्कृतीक बदल घडविण्याचे कार्य अधिक परिणामकारक होऊ शकेल असा त्यांचा युक्तीवाद होता. स्वातंत्रप्राप्तीनंतर घटनात्मक पध्दतीने शिक्षणाचा प्रसार सार्वभौम प्रमाणात झाला त्याचे मोठे श्रेय डॉ. आंबेडकरांना जाते डॉ. आंबेडकरांनी दाखविलेली दिशा लक्षात घेऊन शिक्षण प्राप्ती हे ध्येय मानून शिकणारा विद्यार्थी आणि अर्धपोटी राहून स्वत:च्या पाल्यांना शिकविणारा पालक आज मोठया प्रमाणात पहायला मिळत असल्यामुळे शिक्षणाचा प्रस्तार वाढलेला दिसत आहे. प्रत्येक क्षेत्रात दिसणारी सर्वसामान्य मानसाची घौडदौड केवळ शिक्षणामुळे सुरू झालेली आहे. गतकाळात उष्टया अन्नासाठी

तासनतास राबणाऱ्या दलीत आज स्वाभीमानाने जीवन जगत आहे.

मागासलेल्या लोकांसाठी शिक्षणाचे महत्व जानून डॉ. आंबेडकरांनी मोफत शिक्षणाची आणि सवलतीच्या शिक्षणाची शिफारस केली. आज त्यांच्या पश्चात पंचावन–साठ वर्षात दलीत, शोषीत, आदिवासी, भटक्या विमुक्त जातीत शिक्षणाची प्रगती झाली नव्हे तर शिकून सर्वच घटकातील माणूस आज समोर आलेला आहे. मानवाने मानव म्हणून स्वत:ची ओळख मोठया प्रमाणावर करून दिलेली आहे. मात्र जे शिक्षण मागासवर्गीयासाठी आवश्यक होते ते त्यांना न मिळता त्यांतही प्रगत लोकांचाच वाटा मोठया प्रमाणात दिसून येत आहे.

प्राथमिक शिक्षणाचा प्रसार सर्व दुर होत असला तरी उच्च शिक्षणाच्या निमीत्याने निघालेल्या बडया संस्थांनी गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांची केवळ लयलूट चालविली आहे. बाबासाहेबांनी त्याही काळात हा संभाव्य धोका ओळखला होता. म्हणून वेळोवेळी त्यांनी विद्यापीठ हया संस्था होऊ नयेत असे बोलून दाखविले. उच्च शिक्षणाचा प्रश्न असो की शिक्षणातील सवलतीलचा प्रश्न असो या सर्व शैक्षणिक उपक्रमात सरकारने दक्ष असण्याची गरज त्यांनी वेळोवळी बोलून दाखविली होती. उच्च शिक्षण ती केवळ एकाच वर्गाची मिरास न बनता सर्वच वर्गात उच्च शिक्षणाचा प्रसार होण्याकडे सरकारचे लक्ष असावयास पाहिजे. प्रादेशिक विद्यापीठाची स्वायतता पुरस्कृत जरी त्यांनी केली असली तरी सर्व प्रांतातील शिक्षण समान पातळीवर आणि समान प्रमाणात असल्यावर त्यांनी भर दिला होता.

वेळोवेळी सुचना करून दुरदृष्टीने शिक्षणातील संभाव्य धोके स्पष्ट केले असले तरी शिक्षणाच्या आजच्या झालेल्या स्थितीला सारा समाज आणि तोही शिक्षीत समाज कारणीभूत ठरला असल्याचे निदर्शनास येते. बदलल्या काळात शिक्षणाचा प्रसार झाला असला तरी वैचारीक मानसाचा तुडवडा जानवतो आहे.

निष्कर्ष :

१) शिक्षणामुळे सामाजिक, आर्थिक, वैचारिक, सांस्कृतिक समानता प्रस्थापित करता येते.
२) शिक्षणामुळे विचार संपन्न पिढयाची निर्मीती होऊन सामाजिक प्रगती साधता येते.
३) सक्तीच्या शिक्षणामुळे समाजामधील भेदभाव नष्ट होण्यास मदत होत असते.
४) नितीमक्तायुक्त समाजाचा पाया शिक्षणामुळे रोवल्या जाते.
५) शिक्षणामुळे लोकांमधील वैचारीक पातळी वाढून समाधानी जिवनाचा पाया रोवला जातो.

संदर्भग्रंथ :—


१) डॉ. सौ. प्रतीभा सुधारे पेंडके — उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण
२) प्रा. ना. ग. पवार —शिक्षण क्षेत्रातील विचारवंत
३) किर धनंजय —डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पाप्युलर प्रकाशन, मुंबई २००३
४) प्रा. वामन निंबाळकर (संपा)— डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर
५) प्रा. यादव गायकवाड — भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जिवन व कार्य, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद २००७
६) पानतावने गंगाधर पत्रकार —डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रतिभास प्रकाशन, पुणे १९९६
७) जॉन डिवी अनुवाद लाडली मोहन माथुर—शिक्षा और लोकतंत्र